## कलम ४ (१) (ब) (i)

**मुंबई विद्यापीठ** येथील**शाहिर अमरशेख अध्यासन कार्यानयातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील:**

**कार्यालयाचे नाव** : शाहिर अमरशेख अध्यासन

**पत्ता** : मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, तिसरा मजला, 'बी' रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

**दूरध्वनी**: ०२२ २२८५०३९०.

**कार्यालय प्रमुख** : प्रा. डॉ. प्रकाश खांडगे.

**शासकीय विभागाचे नाव** : मुंबई विद्यापीठ

**कोणत्या मंत्रालयातील** : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

**खात्याच्या अधिनस्त**

**कार्यक्षेत्र** : महाराष्ट्र

**विशिष्ट कार्य** : महाराष्ट्रातील लोप पावत चाललेल्या लोककला प्रकारांवर संशोधण करणे

**विभागचे ध्येय** : महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन व्हावे या दृष्टीने योगदान.

**विभागाचे धोरण** : महाराष्ट्रातील लोककलांचे जतन, संवर्धन संशोधन, करणे लोककलेत पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास पुस्तके उपलब्ध करून देणे. लोककलेच्या अभ्यासाविषयी योग्य ती माहिती पुरविणे

**सर्वसंबधित कर्मचारी** :

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| **शिक्षक कर्मचारी** | | |
| १. | प्रा. डॉ. प्रकाश खांडगे | समन्वयक (कायमस्वरूपी) |
| **शिक्षकेतर कर्मचारी** | | |
| १. | पराग कुलकर्णी | दृक-श्राव्य तंत्रज्ञ (हंगामी) |
| २. | विकास कोकाटे | संशोधन सह -समन्वयक (हंगामी) |
| ३. | आरती सायगावकर | लिपिक टंकलेखक (हंगामी) |
| ३. | विनोद मोरे | शिपाई (हंगामी) |
| ४. | तात्यासो मोहिते | वाहन चालक (हंगामी) |

**कार्य**: महाराष्ट्रातील पारंपरिक लोककलांचे जतन, संवर्धन आणि संशोधन कार्य करणे

**कामाचे विस्तृत स्वरूप**: महाराष्ट्रातील लोप पावत चाललेल्या लोककला प्रकाराचे संशोधन करणे,

ग्रंथ प्रसिध्द करणे, ध्वनिचित्रण फिती तयार करणे, लोककलावंत आणि लोकसाहित्याचे अभ्यासक यांच्या मुलाखती घेणे

**मालमत्तेचा तपशील** :

**इमारती व जागेचा तपशील**: मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, तिसरा मजला, 'बी' रोड,

चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी : ०२२ २२८५०३९०.

**संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशील :**

कुलगुरू

।

विभागप्रमुख लोककला अकादमी

।

**समन्वयक- शाहीर अमरशेख अध्यासन**

शिक्षक कर्मचारी शिक्षकेत्तर कर्मचारी

शिक्षकेत्तर कर्मचारी
दृक - श्राव्य तंत्रज्ञ
संशोधन समन्वयक (१)(हंगामी)
संशोधन सह समन्वयक (४)(हंगामी)
कनिष्ठ टंकलिपीक (१) (हंगामी)
शिपाई (१)(हंगामी)
वाहन चालक (१) (हंगामी)
**कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व वेळा** : ०२२ २२८५०३९०.

सकाळी १०. २० ते ६. ००वाजेपर्यंत

जेवणाची वेळ - दुपारी १.०० ते १. ३०

**साप्ताहिक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा**:सर्व रविवार व महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार

**कलम ४ (१) (क) (ड) लागू नाही**

**कलम ४ (१) (ब) (ii) नमुना (अ)**

मुंबई विद्यापीठ येथील शाहिर अमरशेख अध्यासन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशील :

**अ**

| अनु.क्र. | पदनाम | अधिकार- आर्थिक | कोणत्या कायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | समन्वयक | विद्यापीठ अनुदानआयोग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ व मुंबई विद्यापीठ नियमांनुसार | विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानांनुसार | -- |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| २. | दृकश्राव्य तंत्रज्ञ, | आर्थिक अधिकार नाहीत | -- | -- |
| ३. | संशोधन सह समन्वयक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ४. | संशोधन सह समन्वयक, | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ५. | कनिष्ठ टंकलिपीक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ६. | शिपाई (हंगामी) | आर्थिक अधिकार नाहीत | -- | -- |
| ७. | वाहन चालक (हंगामी) | आर्थिक अधिकार नाहीत | | |

**ब**

| अनु.क्र. | पदनाम | अधिकार- प्रशासकीय | कोणत्या कायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | समन्वयक | विद्यापीठ अनुदानआयोग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ व मुंबई विद्यापीठ नियमांनुसार | विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानांनुसार | -- |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| २. | दृकश्राव्य तंत्रज्ञ,(हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | -- | -- |
| ३. | संशोधन समन्वयक(हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | -- | -- |
| ४. | संशोधन सह समन्वयक,(हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | ---- | --- |
| ५. | कनिष्ठ टंकलिपीक (हंगामी) | महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता नियमावली १९८४ नुसार | --- | --- |
| ६. | शिपाई (हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | -- | -- |
| ७. | वाहन चालक (हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | --- | --- |

**कलम ४ (१) (ब) (ii) नमुना (ब)**

| | | | | ब |
|---|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **पदनाम** | **कर्तव्य - प्रशासकीय** | **कोणत्या कायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार** | **अभिप्राय** |
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | समन्वयक, | १शाहीर अमरशेख अध्यासनाची सर्व प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी<br>२ शाहीर अमरशेख अध्यासनाच्या संशोधन कार्याची जबाबदारी<br>३ संशोधनाच्या संकलित माहीतीचे विश्लेषण आणि संशोधन जबाबदारी | विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |

**शिक्षकेत्तर कर्मचारी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | संशोधन समन्वयक | १ क्षेत्रिय संशोधनाचे दौरे ठरविणे<br>२ संबंधित लोककलावंतांशी संपर्क साधणेप<br>३ प्रत्यक्ष संशोधन दौरे करणे | | |
| २. | संशोधन सह-समन्वयक | १ संशोधन समन्वयकाने गोळा केलेली माहिती व लोककलावंतांच्या ध्वनीचित्रमुद्रित मुलाखतींचे लेखन करणे. २. लोककलावंताच्या मुलाखती घेणे.<br>२ लोककला प्रकारानुसार डेटा तयार करणे | | |
| ३ | दृकश्राव्य तंत्रज्ञ | संशोधन दौऱ्यात संशोधना संबंधी मुलाखती आणि लोककलाप्रकाराचे चलचित्रिकरण आणि छायाचित्रण काढणे | | |
| ४ | कनिष्ठ टंकलिपीक(हंगामी) | १ विभागातील पत्रव्यवहारांची, नस्तीची नोंद करणे.<br>२ विभागात आलेल्या पत्रांची पोच देणे.<br>३ नवीन नस्ती तयार करणे आणि कारकुनी कामावर लक्ष ठेवणे<br>४ वेगवेगळ्याा नोंदपुस्तके तसेच नमुन्याचे छापील कागद ठेवणे.<br>५ योग्य कार्यवाहिसाठी आवश्यक असलेली उपयुक्त माहिती गोळा करणे.<br>६ दररोजच्या कामाची नोंद ठेवणे आणि आठवड्याच्या थकलेल्या कामाचा अभिप्राय वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे. | | |

शाहीर अमरशेख अध्यासन मुंबई विद्यापीठ ५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | शिपाई (हंगामी) | १ विभागातील खिडक्याा उघडून देणे आणि पंखे चालू करणे व आवश्यक नसेल तेव्हा ते बंद करणे.<br>२ विभागातील साधनसामग्री, टेबल, यंत्रे, नस्ती यांची धूळ साफ करणे. तसेच यंत्रावरची कवर घालणे व काढणे<br>३ विभागात आलेल्या पत्रव्यवहार व परिपत्रके यांची विभागणी करुन ती योग्या त्या नस्ती मध्ये ठेवणे. ४ पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन पत्रे देणे.<br>५ कार्यालयात तसेच बाहेर जसा प्रसंग असेल त्याप्रमाणे कागदपत्रे, नस्ती व पत्रे पोच करणे.<br>६ विभागातील वाहून नेण्याजोगे यंत्रे व नस्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेणे.<br>७ आवश्यकता असेल तेंव्हा कर्मचाऱ्यांना व बाहेरील पाहूण्यांना पाणी, चहा देणे.<br>८ विभागप्रमुखांच्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिलेले इतर कामे करणे. | | |
| ६ | वाहन चालक(हंगामी) | विभागातील वाहनाची देखभाल करणे , वाहन धूणे संशोधन दौऱ्यावर अधिकाऱ्यांना घेऊन जाणे | | |

| क आणि ड | | | | |
|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | पदनाम | कर्तव्य - फौजदारी आणि अर्धन्यायिक | कोणत्याकायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | समन्वयक | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मध्ये फौजदारी कर्तव्यांचा स्पष्ट उल्लेख नाही | निरंक | -- |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| ३. | संशोधन समन्वयक | -- | -- | -- |
| ४. | दृक श्राव्य तंत्रज्ञ | -- | -- | -- |
| ५. | संशोधन सह समन्वयक | -- | -- | -- |
| ६. | कनिष्ठ टंकलिपीक (हंगामी) | महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता नियमावली १९८४ नुसार अर्धन्यायीक कर्तव्यांचा स्पष्ट उल्लेख नाही | -- | -- |
| ७. | वाहन चालक (हंगामी) | -- | -- | -- |
| ८. | शिपाई (हंगामी) | -- | -- | -- |

**कलम ४ (१) (ब) (iii)**

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदाईत्व करून कार्यपद्धतीचे प्रकाशन :

कामाचे स्वरुप : महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला प्रकारांचे जतन, संवर्धन,संशोधन व्हावे या दृष्टीकोनातून कार्य. लोककलावंत लोकसाहित्याचे अभ्यासक यांच्या मुलाखती घेणे. लोककलाप्रकारावर विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, शिबीरे, परिसंवाद याचे आयोजन करणे.

अधिनियमाचे नाव: महाराष्ट्र प्रमाणसहिंता नियमावली १९८४

नियम : महाराष्ट्र प्रमाणसहिंता नियमावली १९८४ नुसार तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार.

शासन निर्णय : महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार

कार्यालयीन आदेश : मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार

## कलम ४ (१) (ब) (पअ) नमुना (अ)

**नमुन्यामध्ये कामाचे प्रकटीकरण**

**संघटनांचे लक्ष (वार्षिक)**

| अनु. क्र. | काम / कार्य | कामाचे प्रमाण | आर्थिक लक्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | |

## कलम ४ (१) (ब) (iv) नमुना (ब)

| अनु. क्र. | काम / कार्य | दिवस/तास पुर्ण करण्यासाठी | जबाबदार अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## कलम ४ (१) (ब) (v) नमुना (अ)

कामाशी संबंधित नियम, अधिनियम

| अनु. क्र | सुचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम क्रमांक व वर्षे | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्रअकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयाये प्रमाणसहिंता नियमावली १९८४ नुसार आलेले विषय | महाराष्ट्रअकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयाये प्रमाणसहिंता नियमावली १९८४ नुसार | ---------- |

## कलम ४ (१) (ब) (v) नमुना (ब)

कामाशी संबंधित शासननिर्णय

| अनु. क्र | शासनाच्या निर्णयानुसारदिलेले विषय | शासननिर्णय क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्रशासनाच्या निर्णयानुसार आलेले विषय | महाराष्ट्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके | ---------- |

## कलम ४ (१) (ब) (v) नमुना (क)

कामाशी संबंधित परिपत्रके

| अनु. क्र | शासनाच्या पत्रकानुसारदिलेले विषय | परिपत्रक क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्रशासनाच्या परिपत्रकानुसार आलेले विषय | महाराष्ट्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके | ---------- |

## कलम ४ (१) (ब) (v) नमुना (ड)

कामाशी संबंधित कार्यालयीन आदेश/धोरणात्मक परिपत्रके

| अनु. क्र | शासनाच्या पत्रकानुसारदिलेले विषय | परिपत्रक क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार आलेले विषय | मुंबई विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके | ---------- |

**कलम ४ (१) (ब) (v) नमुना (इ)**

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनात** उपलब्ध दस्तऐवजांची यादी दस्तऐवजांचा विषय

| अनु. क्र | दस्तऐवजाचा प्रकार | विषय | संबंधित व्यक्ती/ पदनाम | व्यक्तीचे ठिकाण/ उपरोक्त कार्यालयात उपलब्ध नसल्यास |
|---|---|---|---|---|
| १ | नोंदपुस्तक | कर्मचाऱ्यांचे हजेरीपट | समन्वयक/ विभागप्रमुख | |
| २ | नोंदपुस्तक | कर्मचाऱ्यांची ये-जा नोंदवही | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ३ | नोंदपुस्तक | जावक नोंदवही | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ४ | नोंदपुस्तक | डेड स्टॉक रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ५ | नोंदपुस्तक | स्टॉक रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ६ | नोंदपुस्तक | हिस्ट्री रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ७ | नोंदपुस्तक | पिटी कॅश रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ८ | नस्ती | कार्यालयीन नस्ती | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ९ | नोंदपुस्तक | ग्रंथालय पुस्तके नोंदवही | संशोधन सहसमन्वयक | |
| १० | नोंदपुस्तक | ध्वनीचित्रमुद्रित केलेल्या मुलाखती लोककला प्रकारांच्या डी.व्ही कॅसेटची नोंदवही | दृकश्राव्य तंत्रज्ञ | |

**कलम ४ (१) (अ) (vi)**

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनातील** दस्तऐवजांची वर्गवारी

| अनु. क्र | विषय | दस्तऐवजाचा प्रकार/नस्ती/ मस्टर/नोंदपुस्तक/ इ. | प्रमुख बाबींचा तपशीलवार | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | Petty cash | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| २ | Purchase(Non Recurring) | नस्ती | बिले आवर्ती खर्च | १० वर्ष |
| ३ | Purchase (Recurring) | नस्ती | बिले अनावर्ती खर्च | १० वर्ष |
| ४ | Repairs & Maintenance | नस्ती | बिले | १० वर्ष |
| ५ | Seminars & Workshops | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ६ | Staff Changes( Non Teaching Staff | नस्ती | क्षिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजेरी | १० वर्ष |
| ७ | Stationary | नस्ती | परिपत्रके बिले | १० वर्ष |
| ८ | G.A.D. | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ९ | Vice-Chancellor | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| १० | Ragistrar | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ११ | Account | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| १२ | Telephone | नस्ती | दूरध्वनी बिले आणि नोंद | १० वर्ष |
| १३ | RTI | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |

## कलम ४(१)(अ) (vii)

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनाती**ल परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था

| अनु. क्र | सल्ला मसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम/परिपत्रकाद्वारे | पुनरावृत्तीकाल |
|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | |

## कलम ४(१)(अ) (vii) नमुना (अ)

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनाती**ल समितीची यादी प्रकाशित करणे

| अनु. क्र | समितीचे नाव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

## कलम ४(१)(अ) (vii) नमुना (ब)

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनाती**ल अधिसभांची यादी प्रकाशित करणे

| अनु. क्र | सभेचे नाव | सभेचे सदस्य | सभेच उद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | | | |

**कलम ४(१)(अ) (vii)नमुना (क)**

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनाती**ल परिषदांची यादी प्रकाशित करणे

| **अनु. क्र** | परिषदेचे नाव | परिषदेचे सदस्य | परिषदेचे उद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | | | |

**कलम ४(१)(अ) (vii)नमुना (ड)**

**मुंबई विद्यापीठातील शाहीर अमरशेख अध्यासनाच्या** कोणत्याही संस्थेची यादी प्रकाशित करणे

| **अनु. क्र** | संस्थेचे नाव | संस्थेच सदस्य | संस्थेचेउद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | | | |

**कलम ४ (१) (ब) (ix)**

**मुंबई विद्यापीठातीलशाहीर अमरशेख अध्यासनाती**ल अधिकारी व कर्मचारी यांची नावे भत्ते व त्यांचे मासिक वेतन

| **अनु. क्र** | पदनाम | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | वर्ग | रूजू दिनांक | दूरध्वनी क्रमांक | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | समन्वयक | प्रा. डॉ. प्रकाश खांडगे | १ | ०१/०३/२०१७ ५ वर्ष कालावधीकरिता नियुक्ती | २२८५०३९० prakash.khandge@gmail.com | ७५,०००/- ठोक मासिक वेतन |
| २ | संशोधन समन्वयक **(हंगामी)** | **रिक्त** | २ | | | १९५००/- ठोक मासिक वेतन |
| ३ | संशोधन सह समन्वयक **(हंगामी)** | श्री विकास मारूती कोकाटे | २ | ३/१०/२०११ ५ वर्षे कालावधी करिता नियुक्ती दि. ५/१०/२०१६ पासून १ वर्ष कालावधीसाठी पुर्ननियुक्ती | २२८५०३९० vkokate00@gmail.com | १५६००/- ठोक मासिक वेतन |
| ४ | दृकश्राव्य तंत्रज्ञ **(हंगामी)** | श्री पराग अरूण कुलकर्णी | २ | ३/१०/२०११ ५ वर्षे कालावधी करिता नियुक्ती दि. ५/१०/२०१६ पासून १ वर्ष कालावधीसाठी पुर्ननियुक्ती | २२८५०३९० paragarun00@gmail.com | १९५००/- ठोक मासिक वेतन |
| ५ | कनिष्ठ टंकलिपीक**(हंगामी)** | आरती सायगावकर | ३ | ०१/०१/२०१७ | २२८५०३९० | ९०००/- ठोक मासिक वेतन |
| ६ | शिपाई**(हंगामी)** | श्री विनोद बबन मोरे | ४ | ०१/०१/२०१७ | २२८५०३९० | ८०००/- ठोक मासिक वेतन |
| ७ | वाहनचालक **(हंगामी)** | तात्यासो मोहीते | ४ | ०१/०१/२०१७ | २२८५०३९० | ९०००/- ठोक मासिक वेतन |

## कलम ४ (१) (ब) (xi)

मुंबई विद्यापीठाच्या शाहीर अमरशेख अध्यासनाचे मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशील यांची विस्तृत माहीती प्रकाशित करणे

- अंदाजपत्रकाच्या प्रतीचे प्रकाशन
- अनुदानाच्या वितरणाच्या प्रतीचे प्रकाशन

| अनु. क्र | अंदाजपत्रकीय शीर्षकाचे वर्णन | अनुदान | नियोजित वापर क्षेत्र व कामाचा तपशील | अधिक अनुदान अपेक्षित असल्यास रूपयात | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| वित्त व लेखा विभागाशी निगडीत | | | | | |

## कलम ४ (१) (ब) (xii) नमुना (अ)-लागू नाही

## कलम ४ (१) (ब) (xii) नमुना (ब)-लागू नाही

## कलम ४ (१) (ब) (xiii)-लागू नाही

**कलम ४ (१) (ब) (xiv)**

मुंबई विद्यापीठाच्या शाहीर अमरशेख अध्यासनातील माहितीचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवलेली माहिती प्रकाशित करणे चालू वर्षाकरिता

| अनु. क्र | दस्तऐवजांचा प्रकार | विषय | कोणत्या इलेक्ट्रॉनिक नमुन्यात | माहीती मिळवण्याची पध्दत | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | पत्रव्यवहार | विभागाने केलेले सर्व पत्रव्यवहार | हार्डडिस्क | रितसर अर्ज | कनिष्ठ टंकलिपीक |
| २ | वर्षवृत्त | विभागाचा चालू वर्षाचा वर्षवृत्त | हार्डडिस्क | रितसर अर्ज | कनिष्ठ टंकलिपीक |
| ३ | सांख्यिकी माहीती | --------- | --------- | --------- | --------- |
| ४ | शोधनिबंध | विभागातील शोधनिबंध | हार्डडिस्क | रितसर अर्ज | कनिष्ठ टंकलिपीक |
| ५ | इतर | विभगतील इतर दस्तऐवल अंदाजपत्रक इ. | हार्डडिस्क | रितसर अर्ज | कनिष्ठ टंकलिपीक |

- टेप
- फिल्म
- सिडी
- फ्लॉपी
- इतर कोणत्याही स्वरूपात

**कलम ४ (१) (ब) (xv)**

मुंबई विद्यापीठाच्या शाहीर अमरशेख अध्यासनातील सुविधांचा तक्ता प्रकाशित करणे
उपलब्ध सुविधा

| | | | |
|---|---|---|---|
| ● | भेटण्याच्या वेळे संदर्भात माहीती | : | स. १०.२० ते १.०० आणि दु. १.३० ते ६.०० |
| ● | वेबसाईट विषयी माहीती | : | http://mu.ac.in/portal/lok-kala-academy |
| ● | कॉलसेंटर विषयी माहीती | : | दूरध्वनी चालिका व चौकशी |
| ● | अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहीती | : | -------------- |
| ● | कामाच्या तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहीती | : | ------------ |
| ● | नमुने मिळण्याबाबत उपलब्ध माहीती | : | -------------- |
| ● | सूचना फलकांची माहीती | : | विभागत १ सूचना फलक असून त्यावर माहीती प्रकाशित केली जाते. |
| ● | ग्रंथालय विषयी माहीती | : | विभागात लोककलेच्या, लोककसाहित्याच्या संशोधन कार्यासाठी लागणारी उपयुक्त पुस्तके उपलब्ध आहेत. |

## कलम ४ (१) (ब) (xvi)

मुंबई विद्यापीठ येथील शाहीर अमरशेख अध्यासनाच्या कार्यालयातील शासकिय माहीती अधिकारी/सहायक शासकीय माहीती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी तेथील लोक प्राधिकरीच्या कार्यक्षेत्रातील घटक यांची विस्तृत माहिति प्रकाशित करणे.

**अ. शासकीय माहीती अधिकारी**

| अनु. क्र | शासकीय माहीती अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता / फोन | ई-मेल | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. प्रकाश खांडगे | समन्वयक | शाहीर अमरशेख अध्यासन | शाहीर अमरशेख अध्यासन, लोककला अकादमी, ३ रा मजला विद्यापीठ विद्यार्थी भवन, पं शोभनाथ मिश्रा मार्ग(बी.रोड) चर्चगेट मुंबई-४०००२० दूरध्वनी-२२८५०३९० | prakash.khandge@gmail.com | डॉ. एम. ए. खान |

**ब. सहायक शासकीय माहीती अधिकारी**

| अनु. क्र | शासकीय माहीती अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता / फोन |
|---|---|---|---|---|
| १ | ------------ | कनिष्ठ टंकलिपीक | शाहीर अमरशेख अध्यासन | शाहीर अमरशेख अध्यासन, लोककला अकादमी, ३ रा मजला विद्यापीठ विद्यार्थी भवन, पं शोभनाथ मिश्रा मार्ग(बी.रोड) चर्चगेट मुंबई-४०००२० दूरध्वनी-२२८५०३९० |

**क. अपिलीय अधिकारी:**

| अनु. क्र | शासकीय माहीती अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता / फोन | ई-मेल | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. एम. ए. खान | कुलसचिव | मंबई विद्यापीठ | मुंबई विद्यापीठ एम. जी. रोड, फोर्ट मुंबई-४०००३२ २२६५६९५३ | registrar@fort.mu.ac.in | समन्वयक, लिपीक |

**कलम ४ (१)(क)- लागू नाही**

**कलम ४ (१)(ड)- लागू नाही**

*<u>मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीच्या अंतर्गत शाहीर अमरशेख अध्यासन कार्यरत असून या अध्यासनाची माहिती पुढील प्रमाणे.</u>*

१) अध्यासनाचे नाव:-शाहीर अमरशेख अध्यासन, लोककला अकादमी मुंबईविद्यापीठ.

२) अध्यासन सुरू करण्यासाठी शासनाने ज्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे, त्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक :-शासन निर्णय क्रमांक :-एमयुएम २००६/(२२/०६)/विशि-५ दिनांक:- ७ मार्च २००७

३) अध्यासनामध्ये मान्यकेलेली पदे :- (शिक्षक व शिक्षकेतर) यांचा तपशील

४) शासनाला प्रस्ताव पाठविला त्या प्रस्तावातील पदे :-

१) प्राध्यापक/ संचालक (एकत्रित वेतन)
२) संशोधन अधिकारी ( लेक्चररचा दर्जा) (दोन पदे)
३) संशोधन समन्वयक ( दोन पदे)
४) तांत्रिक समन्वयक
५) तांत्रिक सहायक
६) वरिष्ठ लिपीक
७) शिपाई
८) वाहन चालक

शाहीर अमरशेख अध्यासनासाठी माननीय कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागार समिती गठीत करण्यात आली.त्या समिती सदस्यांची नावे

१) माननीय कुलगुरू- अध्यक्ष
२) प्र-कुलगुरू - सदस्य
३) संचालक विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळ- सदस्य
४) वित्त व लेखाधिकारी - सदस्य
५) प्रा. डॉ. प्रकाश खांडगे- सदस्य सचिव, समन्वयक
६) प्रा. दत्ता भगत - सदस्य
७) प्रा. वामन केंद्र - सदस्य
८) प्रा.डॉ. हरिश्चंद्र थोरात -सदस्य

शाहीर अमरशेख अध्यासनाच्या सल्लागार समीतीवर असलेलेदोन सदस्य डॉ. अशोक रानडे, लोकशाहीर विठ्ठल उमप यांचे दु:खद् निधन झाले त्यामुळेशाहीर अमरशेख अध्यासनाच्या

सल्लागार समितीच्या बैठकीत नवीन तीनसदस्यांची नावे समाविष्ट करण्याचे निश्चित करण्यात आले ती नावे पुढील प्रमाणे-

१) श्रीमती छाया खुटेगावकर

२) डॉ. विश्वनाथ शिंदे

३) डॉ. प्रभाकर मांडे

या समितीने सुचविल्या नुसार खालील पदे निश्चित करण्यात आली. ती अशी.-

१) संशोधक समन्वयक (एक पद)

२) संशोधन सह-समन्वयक (चार पदे)

३) तंत्रज्ञ दृकश्राव्य (एक पद)

सदर पदेएकत्रित वेतनावर भरण्यासाठी २९ मे २००८ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकिनुसार मान्यता मिळाली सदर पदांचा अनुशेष खालील प्रमाणे

१) संशोधक समन्वयक (एक पद) :- (खुला)

२) संशोधन सह-समन्वयक (चार पदे) :- (अजा-१, अज-१, खुला-२)

३) तंत्रज्ञ दृकश्राव्य (एक पद) :- (खुला)

संशोधनही बाब आस्थापना विभागाच्या अंतर्गत येत असून अध्यापक नियुक्ति विभागाच्या अंतर्गत येत नाही असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शाहीर अमरशेख अध्यासनात समन्वयक म्हणून लोककला अकादमीचे प्रपाठक प्रा. डॉ. प्रकाश खांडगे, आतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. अध्यासनात ५ वर्षासाठी वरील पदे भरली गेली आहेत.

१) संशोधक समन्वयक (एक पद)

२) संशोधन सह-समन्वयक (चार पदे)

३) तंत्रज्ञ दृकश्राव्य (एक पद)

ही पदे भरलेली आहे. कनिष्ठ लिपीक, शिपाई आणि वाहन चालक ही पदे मुंबई विद्यापीठाच्या आस्थापना विभागातून हंगामी स्वरूपात भरली जातात.

<u>अध्यासन सुरू करण्याचा उद्देश :-</u>

महाराष्ट्र शासनाने मुंबई विद्यापीठाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीला शाहीर अमरशेख अध्यासन प्रदान केले. त्यासाठी दीड कोटी रूपयांचे एक रक्कमी अनुदान देण्यात आले. हे अध्यासन सुरू करण्याचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

१) कालौघात अस्तंगत होत चाललेल्या पारंपारिक लोककलांचे जतन-संवर्धन, संशोधन.

२) लोककलांचे विविधरंगी संशोधन उदा. भाषिक अंगाने, धर्मेतिहास अंगाने, प्रयोगात्मक अंगाने.

३) महाराष्ट्रातील लोककला प्रकार आणि भारतीय लोककला प्रकारांचा तौलनिक अभ्यास.

४) लोककला प्रकारांचे आधुनिक स्वरूपातील उपयोजन.

५) महाराष्ट्रातील शाहीर पंरपरेचे विस्तृत संशोधन.

६) महाराष्ट्रातील लोककला प्रकारांचे राज्यात, अन्य राज्यांत व परदेशात सादरीकरण

७) महाराष्ट्रातील लोककला प्रकार आणि अन्य राज्यातील लोककला प्रकार तसेच अन्य देशातील लोककला प्रकार यांचे आदान-प्रदान.

८) लोककला, लोकसाहित्य समिक्षा या स्वरूपात असतील.

९) लोककलेचा कोष तयार करणे

१०) शाहीर अमरशेख अध्यासनाने केलेल्या लोककलेच्या संशोधनावर अभ्यासपट तयार करणे.

११) शाहीर अमरशेख अध्यासनाने केलेल्या लोककलेच्या संशोधनाचे पुस्तक विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपलब्ध करून देणे.

१) वर नोंदविलेलले उद्दीष्टांवरून स्पष्ट होते की आज अस्तंगत होत चाललेल्या लोककलांचे जतन-संवर्धन होऊन लोक संस्कृती जागृत ठेवता येईल. लोककलेचे मुख्य तीन उद्दिष्ट असतात. आध्यात्मिक उद्‌बोधन समाज प्रबोधन आणि लोकनुरंजन या तीन उद्देशातून

लोककला फलीत होत असते.किर्तन, भारूड, पोवाडा अशा लोककलेतून सामाजिक जागृती व वैचारिक प्रबोधनाची गंगोत्री सतत वाहत असते. लोककलेचे एकूण फलीतच सामाजिक जागृतीसाठी असल्याने विद्यापीठ परीसरात असलेल्या विद्यर्थ्यांच्या जीवनावर या कलेचा परिणाम हा लाभच प्राप्त करून देतो करण विद्यापीठाचे उद्दिष्ट ही एक सुशिक्षित, समक्ष नागरीक घडवणेच आहे. ज्यात अनेक प्रकारचे शिक्षणक्रम आज विद्यापीठ राबवीत आहे. त्यातच कलेद्वारे समाज जागृतीस पोषक ठरणारी संस्कृती म्हणजेच लोककला या लोककलेचे जतन-संवर्धनाचे काम शाहीर अमरशेख अध्यासन डोळसपणे पार पाडित आहे.

शाहीर अमरशेख अध्यासन दरवर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती १ ऑगस्टला साजरी करते त्यामुळे त्यांनी केलेल्या १९६० च्या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपल्या पोवाडा या लोककलेद्वारे लढलेल्या लढाई चे दर्शन घडते ज्या मुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते आणि सोबतच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या अन्य साहित्याचा अभ्यास आणि दर्शन घडते. त्याच प्रमाणे अखिल भारतीय लोककला संमेलनात अध्यासन दरवर्षी विद्याविषयक सक्रिय सहभाग घेत असल्याने आज लोककला समेंलन हे सामान्य जनता आणि विद्यार्थ्यांचे आकर्षण बिंदू ठरले आहे. सोबतच लोककलेच्या समस्या व लोककलेला संलग्नीत अनेक सामाजीक विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात येतो ज्यामुळे अनुभवी अभ्यासकांचे अनुभव व संशोधनाचा अभ्यास करणे विद्यार्थ्यांना सोपे जाते आणि सोबतच आपल्या संस्कृतीचे महत्व विद्यार्थ्यांना पटते.

२) मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमी अंतर्गत शाहीर अमरशेख अध्यासन सुरू करण्यात आले आहे. त्याचे निकष लावण्यासाठी पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर, संगीत नाटक अकादमी दिल्ली, सांस्कृतिक संचालनालय महाराष्ट्र शासन, लोकरंग सांस्कृतिक मंच ठाणे, इत्यादिंचा विचार योग्य ठरेल.

३) शाहीर अमरशेख अध्यासन हे शासनाने दिलेल्या दिड कोटी एक रक्कमी निधीच्या व्याजातून सुरू आहे.

४) सदस्य स्थितीत अध्यासनाचा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा वेतनाचा खर्च तसेच संशोधनासाठी आवश्यक असणारा खर्च तसेच अन्य अनुशंगिक खर्च शासनाकडून प्राप्त झालेल्या एकरक्कमी निधीच्या कायम ठेविच्या व्याजातून भागविणे शक्य नाही त्यापोटी काही रक्कम विद्यापीठाच्या सर्व साधारण निधीतून खर्च होत आहे.

५)   सदरहू अध्यासनासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने एकरक्कमी दीड कोटी  रूपये  अनुदान सन २००६ मध्ये दिले. त्यावेळी कायम ठेवीचा व्याजदर अंदाजे ११ टक्के होता. त्यानंतर आता व्याजदर सात ते आठ टक्क्यांवर आलेला असल्याने कायम स्वरूपी ठेवीच्या व्याजातून अध्यासनाचा सर्व खर्च भावी काळात भागविणे कठीण जाईल शासनाने  या अध्यासनाची शिक्षकेतर पदे , शिक्षक पदे अनुदानावर घेतली तर त्यांच्या वेतनाचा भार भावी काळात

अध्यासनावर पडणार नाही साधारणत: २०१२ -२०१३ या शैक्षणिक आर्थिक वर्षापासून शाहीर अमरशेख अध्यासनाची खालील पदे अनुदानावर घेतली जावीत.

१) संशोधन समन्वयक (एक पद),
२) संशोधन सह-समन्वयक (चार पदे),
३) तंत्रज्ञ दृकश्राव्य (एक पद),
४) टायपिस्ट क्लार्क(एक पद),
५) शिपाई (एक पद),
६) वाहन चालक (एक पद)

कायम ठेवी वरील व्याजातून संशोधन कार्याचाऱ्यांचा खर्च त्यामुळे भागविता येईल व त्याचा भार अध्यासनावर पडणार नाही.

<u>शाहीर अमरशेख अध्यासनाने केलेल्या कामाचा अहवाल:—</u>

१) नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंगआर्ट येथे लावणी कार्यशाळा घेण्यात आली.

२) १ ऑगस्ट २००९ अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने विद्यानगरी परीसर येथे चर्चासत्र तसेच शाहीरी फुलोरा कार्यक्रम आयोजित केला व माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शाहिरांचा सत्कार करण्यात आला.

३) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर 'गर्जा महाराष्ट्र माझा' माहितीपट बनविण्यात आला. व 'गर्जा महाराष्ट्र माझा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकाची प्रस्तावना संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या नेत्या रोझा देशपांडे यांनी केली. 'गर्जा महाराष्ट्र माझा' या माहितीपटात शाहीर आत्माराम पाटील, शाहीर लिलाधर हेगडे, शाहीर साबळे, शाहीर चंदु भरडकर, शाहीर विठ्ठल उमप, रोझा देशपांडे या मान्यवरांच्या मुलाखती अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. या माहितीपटाचे सूत्रसंचालन सुप्रसिध्द अभिनेते मिलिंद गुणाजी यांनी केले.

४)रायरंद, खडीगंमत आणि बोहाडा हे संशोधन प्रकल्प राबविण्यात आले.

५) अण्णा भाऊ साठे जयंती १ ऑगस्ट २०११ फिरोज शहा मेहता सभागृह विद्यानगरी परीसर येथे आयोजित करण्यात आला त्यात परिसंवाद आणि ज्ञानेश महाराव लिखित 'जिंकू या दाही दिशा' या नाटकाचा प्रयोग करण्यात आला.

६)अखिल भारतीय पहिले लोककला संमेलन दिनांक २४, २५, २६ सप्टेंबर २०१० मध्ये आयोजित करण्यात आले होते. त्यात सक्रीय सहभाग.

७) अखिल भारतीय मराठी लोककला समेंलन कऱ्हाड येथे दिनांक २९ व ३० एप्रिल व १ मे २०११ या कालावधित आयोजित करण्यात आले होते. त्यात अध्यासनाचा सक्रीय सहभाग होता. व अध्यासनाने संशोधन केलेल्या दोन विषयावरील पुस्तके रायरंद आणि खडी गंमत याचे प्रकाशन मा. ना. सुशील कुमार शिंदे उर्जामंत्री, यांच्या हस्ते करण्यात आले.

८) पहिले अखिल भारतीय महिला लोककला संमेलन ९ व १० ऑक्टोबर २०११ महिलांच्या जीवन व कलाविषयक परिसंवादात शाहीर अमरशेख अध्यासनाचा विद्याविषयक सहभाग,बीजभाषण प्रा.डॉ. तारा भवाळकर, आदिवासी महिला जीवन, त्यांचे पर्यावरण आणि कला- संवाद की विसंवादअध्यक्ष:
डॉ. मधुकर वाकोडे, वक्ते : डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. मनोज तायडे, डॉ. महेश्वरी गावित, नितीन केळकर, परिसंवाद महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उभारणीत संतकवयित्रींचे योगदान अध्यक्ष : डॉ. अरूणा ढेरे वक्ते : डॉ. सदानंद मोरे, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. दीपा क्षिरसागर.

९)दयानंद विज्ञान महाविद्यालय लातूर येथे २५ व २६ फेब्रुवारी २०११ रोजी लोकसाहित्याचे संशोधन स्वरूप व दिशा या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील संशोधन परिषद आयोजित करण्यात आली होती त्यात अध्यासनाने ज्या लोककला सादर झाल्या त्या पथकांना मानधन दिले व सक्रीय सहभाग घेतला.

१०) ऑक्टेव फेस्टीवलचे चित्रीकरण औरंगाबाद

११) कऱ्हाड येथील कलगीतुरा या लोककला प्रकारचे चित्रीकरण

१२) ज्येष्ठ लोककलावंतांची मुलाखत चित्रीकरण सुरू आहे.

१०)मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी अंतर्गत शाहीर अमरशेख अध्यासन आणि **National Society for Equal Opportunities for The Handicapped, INDIA.** यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष शिक्षक ज्यांची शैक्षणिक अर्हता **B.A., B.Ed.** असेल त्यांच्यासाठी लोककला प्रशिक्षण शिबीर दि. २६ मार्च ते ३० मार्च २०१२ या कालावधीत **National Society for Equal Opportunities for The Handicapped, INDIA.** पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर मुंबई ४०००७१ येथे दु. २ ते सायं. ५ या दरम्यान आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरातून विशेष शिक्षकांना संगीत, नृत्य, वाद्य व लोककला माध्यामांतून प्रशिक्षण दिले गेले. विशेष मुलांना या कलेच्या माध्यमातून व्यक्तीमत्व विकास साधता येईल असे कार्यक्रम राबविण्यात आले.

११)यु. जी. सी. च्या ११ व्या योजनेच्या अंतर्गत विषेश विद्यार्थ्यांचा प्रयोगात्मक कलांच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासासाठी लोककला कार्यशाळेचे आयोजन दि. ४ जुन २०१२ ते ८ जुन २०१२ या वेळेत मुंबई विद्यापीठ शाहीर अमरशेख अध्यासन लोककला अकादमी, आणि National Institute For The Mentally Handicappedयांच्या संयुक्त विद्यमाने, शाहीर अमरशेख सभागृह, विद्यापीठ विद्यार्थी भवन ४ था माळा येथे सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या दरम्यान आयोजितकरण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांना विशेष मुलांच्या शिक्षकांना नृत्य, नाटय, वाद्य, गायन या चारही कलांची ओळख आणि प्रात्याक्षिक शिकविले गेले असूनकार्यशाळेत म्युझीक थेरीपी या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

१२) अण्णा भाऊ साठे जयंती १ ऑगस्ट २०१२ रोजीमार्शल हॉल, पंडित जवाहरलाल नेहरू ग्रंथालय सभागृह विद्यानगरी परीसर येथे आयोजित करण्यात आला त्यात परिसंवाद आणि 'शाहीरी' या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१३) १ ऑगस्ट २०१३ रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीचे औचित्य साधून 'ग्रामोत्सवातील नृत्य नाट्य परंपरा' या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यात गोव्यातील रणमाले, कर्नाटकातील यक्षगान, महाराष्ट्रातील दशावतार या लोककलांचे दर्शन यावेळी घडले. 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या लोकनाट्य व शाहीरीतील योगदान' या विषयावरील परिसंवादात डॉ. बाबूराव गुरव, डॉ विश्वनाथ शिंदे, एकनाथ आव्हाड, लहू कानडे या मान्यवर अभ्सासकांनी सहभाग घेतला.

**१४) प्रतिशीर्ष महोत्सव**

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी अंतर्गत असलेल्या शाहीर अमरशेख अध्यासनातर्फे दरवर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात येते. यानिमित्त ३०,३१ जुलै व १ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रतिशीर्ष महोत्सव आयोजित करण्यात आला. प्रतिशीर्ष महोत्सव म्हणजे मुखवटा महोत्सव या महोत्सवात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे दिग्दर्शक बन्सी कौल, प्रा. कमलाकर सोनटक्के, डॉ. जब्बार पटेल आणि शशीधर आचार्य या चार मान्यवरांनी लोकमंचावरील मुखवट्यांचा वेध घेतला. पश्चिम बंगालमधील पुरूलिया छाऊ तसेच ओरिसामधील सराईकेला छाऊ, महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील आदिवासीचा 'बोहाडा' असे कलाप्रकार सादर करण्यात आले. लोककला अकादमीच्या विद्यार्थ्यांची बोहाडा व छाऊ या कलाप्रकारावर कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. एम. ए. खान यांच्या हस्ते लोककलावंतांच्या मुलाखतीवर आधारीत असलेले पुस्तक 'लोकलेणी' यांचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी बन्सी कौल, प्रा.कमलाकर सोनटक्के, डॉ. जब्बार पटेल, गुरू शशधर आचार्य आणि लोककला अकादमीचे विभागप्रमुख प्रा.डॉ.प्रकाश खांडगे, प्रा.डॉ. गणेश चंदनशिवे, प्रा. मोनिका ठक्कर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. नरेशचंद्र, विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळाचे संचालक डॉ. राजपाल हांडे इ. उपस्थित होते.

**१५) आंतरराष्ट्रीय लोकरंग परिषद २०१५:-**

लोककला अकादमी, शाहीर अमरशेख अध्यासन आणि ISTR [ Indian Societyfor Theatre Research]या संस्थेसोबत संयुक्त विद्यमाने 'आंतरराष्ट्रीय लोकरंग परिषदेचे' आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत १२० अभ्यासकांनी आपला सहभाग नोंदवून शोधनिबंध सादर केले.

## १६) चित्रकथी कार्यशाळा दि.१९ जुलै, २०१५ ते २९ जुलै, २०१५

भारत सरकारचे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, मुंबई विद्यापीठाची लोककला अकादमी, शाहीर अमरशेख अध्यासन आणि विश्राम ठाकर आदिवासी कला अंगण चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ जुलै, २०१५ ते २९ जुलै, २०१५ या कालावधीत पिंगुळी येथील परशुराम गंगावणे यांच्या कला अंगण मध्ये चित्रकथी तसेच बोलक्या बाहुल्यांची १० दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.

## १७) ०१ ऑगस्ट अण्णाभाऊ साठे जयंती, २०१५ (सेंटर फॉर कल्चरल रिसर्च एण्ड ट्रेनिंग कार्यशाळा)

मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमी अंतर्गत असलेले शाहिर अमरशेख अध्यासन आणि केंद्र शासनाची *सी.सी.आर.टी*(सेंटर फॉर कल्चरल रिसर्च एण्ड ट्रेनिंग) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून, आदिवासी विभागात काम करणाऱ्या आणि आदिवासी शिक्षकांसाठी आदिवासींच्या प्रयोगात्म कला प्रकारांवर दि.१ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत विद्यानगरी परिसरातील शंकरराव चव्हाण प्रशासकीय भवन मध्ये निवासी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये मिझोराम, अंदमान निकोबार, सिक्कीम, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम बंगाल आदी भारतातील विविध राज्यांमधील सुमारे ९५ शिक्षकांनी सहभाग घेतला.

या कार्यशाळेत मा. कुलगुरू डॉ. संजय देशमुख, गिरिश प्रभुणे, सांस्कृतिक कार्यसंचालनालयाचे संचालक अजय अंबेकर, डॉ. प्रकाश खांडगे, डॉ. गणेश चंदनशिवे, प्रा. मोनिका ठक्कर, दिपाली परब, रेखा भिवंडीकर, नृत्य दिग्दर्शक दिपाली विचारे आदि मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या समन्वयाची जबाबदारी श्री. विकास कोकाटे (सह समन्वयक, शाहीर अमरशेख अध्यासन) यांनी पार पाडली.

१८) रायरंद/बहुरूपी संशोधन दौरा जामखेड

दि.२७, २८ ऑगस्ट, २०१५ रोजी जामखेड जि. अहमदनगर परिसरातील बहुरूपी या कलाप्रकारावर संशोधन दौरा आयोजित केला. यामध्ये बहुरूपी लोककलावंत यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यांच्या मुलाखती आणि सादरीकरणाचे चित्रीकरण करण्यात आले.

१९) शाहीर अमरशेख जन्मशताब्दी सोहळा २० ऑक्टो २०१५

शाहीर अमरशेख जन्मशताब्दी वर्षारंभानिमित्त माननीय कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाहीर अमरशेख जन्मशताब्दी सोहळा आयोजित करण्यात आला. शाहीर अमरशेख यांच्या तैलचित्राचे उद्‌घाटन शालेय शिक्षण तथा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उदयोग मंत्री मा. सुभाष देसाई, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री मा. रविंद्र वायकर माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. सदानंद मोरे, प्रा. कमलाकर सोनटक्के आदी मान्यवर उपस्थित होते. 'शाहीर अमरशेख व्यक्ती वाड्‌मय विचार' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात डॉ. जब्बार पटेल, डॉ. माधव पोतदार, डॉ. क्रांती जेजूरकर, डॉ. अजीज नदाफ, श्रीमती मल्लिका अमरशेख, मधुकर नेराळे, प्रकाश रेड्‌डी आदी मान्यवर सहभागी होते. 'शाहीर अमरशेख यांची गीते व पोवाडे केशर जैनू चॉद, निशांत जैनू चॉद, शाहीर बागणीकर, शाहीर देवानंद माळी यांनी सादर केले.

२०) **परंपरा महोत्सव आणि लोककथा गायनावर राष्ट्रीय परिषद १८ ,१९ ,२० ऑक्टोबर २०१६**

**शाहिर अमरशेख यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोपाचे औचित्य साधून मुंबई विदयापीठाची लोककला अकादमी आणि त्या अंतर्गत असणाया शाहिर अमरशेख अध्यासना तर्फे दिनांक १८ ,१९ ,२० ऑक्टोबर २०१६ रोजी कवी कुसुमाग्रज मराठी भाषा भवन विदयानगरी परिसर , कलिना येथे परंपरा महोत्सव तसेच लोककथां गायनावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते . ही परिषद इंडियन फोकलोअर कॉंग्रेस यांच्या सहयोगाने घेण्यात आली होती .परिषदेचे उद्घांटन मंहाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव श्री भूंषण गगराणी यांच्या हस्ते झाले.प्रमख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समिक्षक डॉ विजया तापस आणि ज्येष्ठ कवयित्री डॉ अरुणा ढेरे उपस्थित होते. इंडियन फोकलोअर कॉंग्रेसंचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अभ्यासक डॉ जवाहरलाल हांडू योचे बीजभाषण झाले . या परिषदेत भारत भरातून ५० अभ्यासकांनी सहभाग घेतला**

**शाहिर अमरशेखांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान मुंबई विदयापीठाचे कुलगुरु मा. डॉ संजय देशमुख यांनी भुंषविले.या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री मा .श्री रामदासजी**

**आठवले तसेच उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री मा .श्री रवींद्र वायकर होते.डॉ जब्बार पटेल.कुलसचिव डॉ. एम. ए .खान , डॉ अनिल पाटील डायरेक्टर बी.सी.यु.डी , पत्रकार राही भिडे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.**

२१) शक्ती तुरा संशोधन दौरा २१ ते २४ नोव्हे. २०१६

रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यातील कोलाड याठिकाणी शक्ती-तुरा या कलाप्रकारावर संशोधन दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यात अनेक शक्ती-तुऱ्यातील मंडळांनी आपला सहभाग नोंदविला. या कलाप्रकार कलावंताच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती व सादरीकरणाचे चित्रीकरण करण्यात आले.

२२) अहमदनगर संशोधन दौरा २४, २५ डिसें. २०१६

या कालावधीत शासनाच्या वतीने लोकसाहित्य संस्कृती कोश निर्मिती बाबत बैठकिचे आयोजन करण्यात आले होते या बैठकिसाठी शाहीर अमरशेख अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ प्रकाश खांडगे उपस्थित होते. लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे आणि डॉ. अरूणा ढेरे यांच्या मुलाखती अध्यासनाच्या संशोधन कार्यासाठी घेण्यात आल्या.

**२ ३ भक्ती समर्पण महोत्सव :अवघा रंग एकचि झाला**

**भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमी तर्फे दिनांक ३० जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत पंढरपूर भक्ती समर्पण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.प्रख्यात संत त्यागराज यांच्या २५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता.भक्ती संप्रदायातीलं नाटय या रुपाने रसिक ंसमोर आले.या महोत्सवात भारतातील विविध भंक्ति नाटय परंपरेचे दर्शन झाले.या भक्ती नाटय परंपरा कधी नृत्य नाटयं स्वरुपातल्या तर कधी कथां नाटयाच्या स्वरुपातल्या होत्या.मणीपुरचे नट संकीर्तण , बसंत रास , पुंग चोलम हे प्रकार नृत्य नाटयाच्या जवळचे होते. पुंग चोलम आणि ढोल चोलम या प्रकारांनी कृष्ण भक्तीचे नाटय उभें केले.या महोत्सवात छत्तीसगढची पंडवानी ही विशेष आकर्षणाचा विषय ठरली.सयप्पा बंडगर यांचे धनगरी गज ढोल नृत्य , राजन वैदय यांच्या पथकाचा पोवाडा , डॉ तुलसी बेहरे यांचा दशावतार असे अनेक कलाप्रकार या महोत्त्सवात सादर झाले.राष्ट्रीय चर्चा सत्रात डॉ रामचंद्र देखणे, मुकुंद कुळे,ह.भ.प अशोक महाराज काळे, डॉ तारा भवाळकर , डॉ सिसिलिया कार्व्हालो, डॉ विदयासागर पाटांगणकर , राही भिडे, डॉ अरुणा ढेरे, प्रां डॉ गणेशं चंदनशिवे,प्रां . डॉ प्रकाशं खांडगे .श्रीमती चंदाबाई तिवाडी आदींनी आपले विचार व्यक्त केले.**

## २४ मुंबई विदयापीठाचे शाहीर अमरशेख अध्यासन आणि लोककला अकादमी तर्फे लोकसाहित्य -लोककलांवर राष्ट्रीय चर्चासत्र

मराठी राजभाषादिनाच्या पार्श्वभूमीवर शनिवार दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ रोजी मुंबई विदयापीठाचे शाहीर अमरशेख अध्यासन आणि लोककला अकादमी तर्फे शाहीर अमरशेख सभागृह , विदयार्थी भवन , बी रोड , चर्चगेट येथे लोकसाहित्य लोक कलांवर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते."लोककलांचे लौकिकीरण जागतिकीकरण आणि लोककला" हा या चर्चासत्राचा विषय होता.तसेच महाराष्ट्रातील नामवंत लोककलावंतांचा " फुलोरा लोककलांचा" हा सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता.

या चर्चासत्रात ज्येष्ठ कवयित्री डॉ अरुणा ढेरे , महाराष्ट्र शासनाच्या माहिती विभागाचे अध्यक्ष अजय अंबेकर , पत्रकार राही भिडे उपस्थितीत होते तर अध्यक्षस्थानी मुंबई विदयापीठाचे कुलसचिव डॉ . एम. ए .खान होते. चर्चासत्रात डॉ मधुकर वाकोडे , डॉ अनिल सहस्त्रबुध्दे , डॉ विश्वनाथ शिंदे , डॉ रुस्तूम अचलखांब , डॉ हरिश्चंद्र थोरात , संगीत दिग्दर्शक कौशल इनामदार , डॉ प्रविण भोळे , सुहास बहुलकर , डॉ भक्त वत्सल रेड्डी , डॉ गोविंद वर्माराजा ई मान्यवर उपस्थित होते.

समारोप सोहळयाला प्रख्यात पार्श्वगायिकां सुलोचना चव्हाण , ज्येष्ठ नाटय दिग्दर्शक कमलाकर सोनटक्के , ज्येष्ठ चित्रपट अभिनेते शिवाजी साटम उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्ष म्हणून मुंबई विदयापीठाचे बी. सी . यु . डी अनिल पाटील होते.